आशियातील सर्वात मोठ्या स्वयंसेवी ग्राहक संघटनेचे मुखपत्र

RNI No. MAHBIL/2011/39044

वर्ष ११ | अंक ०६ | सप्टेंबर २०२२ | मूल्य रु. ५/-

# Grahak Tituka Melwawa

# ग्राहक तितुका मेळवावा

मुंबई ग्राहक पंचायत

ग्राहक हिताय
ग्राहक सुखाय

CONSUMERS INTERNATIONAL
Member of
Consumers International

## पंचायत पेठ विशेषांक



# पालघर पेठ उत्साहात संपन्न



दीपप्रज्वलन करताना अनुराधा देशपांडे, दीपक भंडारी, विजय सावे, संदेश चुरी, सुनंदा तोडणकर



उद्‌घाटन प्रसंगी श्री. दांडेकर यांचे स्वागत करताना अनुराधा देशपांडे, सोबत संदेश चुरी, दीपक भंडारी, विजय सावे, मधुसूदन जोशी





विनय पाटील सरांनी घेतलेल्या विविध कलात्मक कार्यशाळा

# पेठेतील खास आकर्षणे









## मुंबई ग्राहक पंचायत

**विश्वस्त मंडळ**
डॉ. अनिल काकोडकर
डॉ. बाळ फोंडके
ललिता कुलकर्णी
रविंद्र महाजन
अनुराधा गोरे

**अध्यक्ष**
डॉ. बाळ फोंडके

**उपाध्यक्ष**
अनुराधा गोरे

**कार्यकारी मंडळ**
ॲड. शिरीष देशपांडे (स्वीकृत कार्याध्यक्ष)
अनुराधा देशपांडे (कार्योपाध्यक्ष)
प्रभाकर गवाणे (कार्योपाध्यक्ष)
अनिता खानोलकर (कार्यवाह)
छाया वारंगे (कार्यवाह)
रविंद्र सहस्रबुद्धे (खजिनदार)

**सभासद**
ज्योती मोडक, शीला देवळेकर
राजेंद्र राणे, शुभदा चौकर,
अनघा आचरेकर, विनायक सोमण,
गजानन वर्तक, विवेक केळकर,
शर्मिला रानडे, मंगला गाडगीळ,
आलोक हर्डीकर (स्वीकृत),
अभय जोशी, पराग रेडकर,
अर्चना पानगांवकर (स्वीकृत)

**निमंत्रित**
- *अध्यक्ष, खरेदी समिती*
- *समन्वयक पर्यावरण विभाग*

या अंकात प्रसिद्ध झालेल्या मतांशी संपादक/संघटना सहमत असतीलच असे नाही.


# अनुक्रमणिका

ग्राहक तितुका मेळवावा
१ सप्टेंबर २०२२
श्रावण/भाद्रपद १९४४


| | |
|---|---|
| पंचायत पेठांची पुन्हा एकदा गगन-भरारी | ४ |
| संपादकीय | ५ |
| पालघर पंचायत पेठ उत्साहात संपन्न | ६ |
| गोधडी - जतनशील संस्कृतीचे प्रतिक | ७ |
| आपल्या वाटपात खपली गहू | १० |
| आखूड पैठणीची दीर्घ कहाणी | १० |
| मुलायम, तलम वस्त्रप्रकार | ११ |
| वाचू आनंदे | १२ |
| पंचायत पेठ तक्ता | १३ |
| ग्राहक पंचायत पेठ : दालन-तक्ता | १७ |
| Enjoy Authentic Fabrics in Peth | २१ |
| वीणा वर्ल्डची याचिका फेटाळली | २१ |
| ओला कंपनीची अखेर शरणागती! | २२ |
| सदोष कूकर्स विक्री - ॲमेझॉनला एक लाखाचा दंड! | २३ |
| Visit of Bihar RERA Chairman | २६ |
| Veena World Writ Petition Junked | २६ |
| Details of MGP Consumer Guidance Centres | २७ |
| सजली ग्राहक पंचायत पेठ... | २८ |


## पंचायत पेठ समिती

**अनुराधा देशपांडे (अध्यक्ष)**

**सदस्य**

अनघा आचरेकर, अलका मोकाशी, शुचिता पाटणकर, अंजली बापट, प्रिती कोळमकर, उमा अभ्यंकर, उल्का पाटील, राजेंद्र राणे


- **संपादक :-** शुभदा चौकर
- **संपादकीय साहाय्य :-** सुमिता चितळे, नेहा जोशी, शर्मिला नाईक
- **सल्लागार :-** ॲड. शिरीष देशपांडे, वसुंधरा देवधर
- **मुखपृष्ठ :-** राजेंद्र राणे
- **अक्षरजुळणी व रचना, कला व मुद्रण :-** इंडिया प्रिंटिंग वर्क्स, वडाळा, मुंबई

Printed & Published by **NISHIKANT VINAYAK GURJAR** on behalf of **Mumbai Grahak Panchayat,** Printed at India Printing Works, 42 G. D. Ambekar Marg, Wadala, Mumbai - 400 031 and Published at Mumbai Grahak Panchayat, Grahak Bhawan, Sant Dnyaneshwar Marg, JVPD Scheme, Juhu, Vile Parle (West), Mumbai - 400 056 Ph.: 26288624, 26281832, Fax : 26250916. • Email : mpanchayat@gmail.com • Vitaran Email : mgpvitaran@yahoo.co.in • Website: **https//www.mymgp.org** • Editor : **Shubhada Chaukar**

# पंचायत पेठांची पुन्हा एकदा गगन-भरारी

**– ॲड. शिरीष देशपांडे**, *कार्याध्यक्ष*

**बे**चाळीस वर्षे अविरतपणे बहरत जाणाऱ्या आपल्या मुंबई ग्राहक पंचायतीच्या पंचायत पेठांना करोनाच्या टाळेबंदीमुळे दोन वर्षे सक्तीची विश्रांती घ्यावी लागली. त्यामुळे आपले कार्यकर्ते हिरमुसले, ग्राहक नाराज झाले. सर्वात मोठा आर्थिक फटका बसला तो आपल्या पेठांमधे उत्साहाने सहभागी होणाऱ्या गाळेधारकांना आणि उत्पादकांना. पण सुदैवाने आता तो व्याधीग्रस्त काळ मागे पडला असून सर्वच जण यातून सावरुन नव्या जोमाने आणि नव्या उत्साहाने कामाला लागले आहेत.

ग्राहकांच्या गरजांतूनच नवनव्या तंत्रज्ञानांचा शोध लागत असतो. करोना काळात अत्यंत झपाट्याने सर्वांसमोर दाखल झाली ती म्हणजे ऑनलाईन खरेदीची अनेक नवनवीन दालने आणि ती देखील ग्राहक स्नेही. अगदी सात वर्षांच्या मुलापासून ते सत्तरीच्या आजी आजोबांना सुध्दा ऑनलाईन खरेदी, ऑनलाईन पेमेंट आता चुटकीसारखं जमू लागलं. ग्राहक आता ऑनलाईन सहज हवं त्यावेळी हवी ती गोष्ट घरबसल्या मागवू शकत असल्याने ग्राहक पेठांपुढे एक फार मोठे आव्हान उभे ठाकले होते. अशा अनिश्चित परिस्थितीत आपण पुन्हा एकदा ग्राहक पंचायत पेठांचा सिलसिला यंदा सुरू केला आहे.

सुरुवात पुण्यातून झाली आणि चित्र स्पष्ट झाले. चोखंदळ ग्राहक हा प्रत्यक्ष वस्तू बघून, हाताळून आणि पारखूनच घेणं पसंत करतोय. ऑनलाईन खरेदी ही तात्पुरती गरज आणि सोय असेल तर प्रत्यक्ष खरेदी ही मौज आहे. आणि त्यामुळेच पुणे, दापोली, गोरेगाव आणि पालघर येथे संपन्न झालेल्या आपल्या सर्वच पंचायत पेठांनी आपापले विक्रीचे मागील सर्व उच्चांक पार करून विक्रीची नवी शिखरे गाठली.

ऑनलाईन खरेदीतून वारंवार होणाऱ्या वेगवेगळ्या प्रकारच्या फसवणूकीने ग्राहक त्यापासून दूर जाऊ बघतोय तर ऑनलाईन प्लॅटफॉर्म्सपुढे ग्राहकाला परत आपल्याकडे कसं वळवायचं हे मोठं आव्हान उभं आहे. आणि गंमत म्हणजे यासाठी ऑनलाईन विक्रीमधील आघाडीवरील खेळाडूच आज मुंबई ग्राहक पंचायतीशी सल्लामसलत करून ग्राहकांचा विश्वास संपादन करण्यासाठी काय पावले उचलावीत, असं आपल्याला विचारत आहेत.

आपण त्यांना त्याबाबत योग्य ती औषधमात्रा देत आहोतच, पण यातून मिळणारा संदेश हाच आहे की प्रत्यक्ष खरेदीला पर्याय नाही. मुंबई ग्राहक पंचायतीने गेली ४७ वर्षे समाजात नि:स्वार्थीपणे, केवळ ग्राहक हित लक्षात घेऊनच कार्य केले आहे. पंचायत पेठेत निवड केलेले विविध वस्तूंचे उत्पादक/विक्रेते यांना अनेक कसोट्या पार कराव्या लागतात. त्यामुळे ग्राहक एका विश्वासाने पंचायत पेठेत खरेदी करत असतो. इथे फसव्या, खोट्या डिस्काउंटना स्थान नसते. बिलाशिवाय विक्री करायला इथे अजिबात वाव नसतो. वस्तूंच्या दर्जाबद्दल स्वतः ग्राहक पंचायतच आग्रही असल्याने इथे कोणीही यावे आणि काहीही विकावे, असा मामला दिसणार नाही. आणि म्हणूनच 'पेठांत पेठ, पंचायत पेठ' असं एक छान चित्र आज बाजारपेठेत दिसतंय.

१२ सप्टेंबरपासून आपल्या पंचायत पेठांचा तिसरा टप्पा सुरू होत आहे. दादर, ठाणे, अंधेरी, वसई आणि बोरीवली अशा पाच ठिकाणी या पंचायत पेठा नव्या जोमाने नव्या सळसळत्या उत्साहात संपन्न होत आहेत. यासाठी पंचायत पेठ समितीच्या कार्यकर्त्या गेले अनेक महिने राबताना मी स्वतः प्रत्यक्ष पाहतोय. त्यांच्या मेहेनतीला तोड नाही. गाळेधारकसुध्दा उत्साहात आहेत. यंदाच्या पेठा त्यांना विक्रमी विक्री देतील हा माझा विश्वास आहे. त्यांना माझ्या खूप खूप शुभेच्छा.

आपण सर्वांनी येत्या पाच पेठांचा मोठ्या प्रमाणावर आपापल्या स्तरावर प्रचार आणि प्रसार करायचा आहे. हे आपल्या प्रत्येक कार्यकर्त्याचे कर्तव्य आहे. कारण या पंचायत पेठा म्हणजे केवळ खरेदीचा उत्सव नसून ग्राहक जागृती आणि ग्राहक प्रबोधनाचं एक उत्तम व्यासपीठही आहे, हे आता सर्वांनाच कळून चुकलंय.

या पाचही पंचायत पेठा यशस्वीपणे संपन्न होण्यासाठी माझ्या हार्दिक शुभेच्छा.

♦

संपादकीय

# आपल्या पेठा, आनंद मोठा!

ग्राहक पेठ नामक व्यवस्थेचे 'पेटंट' घेण्याचा प्रयास केला तर आपली 'ग्राहक पंचायत पेठ' असे पेटंट मिळवू शकेल! आज रूढ झालेल्या या व्यवस्थेचे रुजवण करण्याचे श्रेय आपल्या संस्थेचे असावे! १९७५ साली आपली 'मुंबई ग्राहक पंचायत' एक अनोखी वितरण व्यवस्था निर्माण करती झाली. दर्जेदार जीवनावश्यक वस्तू वाजवी किंमतीत उपलब्ध करणाऱ्या या स्वयंसेवी आणि स्वयंपूर्ण यंत्रणेवर सर्व सभासद खूश होते. तेव्हा बहुतांश महिला साड्या परिधान करत असत. चांगल्या मिलच्या साड्या योग्य दरात मिळाल्या तर... असा विचार तेव्हाच्या बिनीच्या कार्यकर्त्या प्रतिभा गोडबोले यांच्या मनात आला. साडी म्हटली की चॉइस महत्त्वाचा, त्यामुळे वाटपातून साड्या देणे शक्य नाही. त्यातून पहिली 'साडी पेठ' १९७८ साली भरवली गेली. तिला उदंड प्रतिसाद मिळाला. मग पुढे त्याचे रूप व्यापक झाले आणि १९८० साली पहिली 'ग्राहक पंचायत पेठ' पार्ल्यात संपन्न झाली. त्यावेळचा उत्साह, उदंड प्रतिसाद आणि ग्राहकांचे समाधान यातून आपल्या संस्थेतर्फे या नव्या व्यवस्थेचा पाया रचला गेला.

उत्तम मूल्याधार असलेल्या त्या भक्कम पायांवर आपल्या ग्राहक पंचायत पेठांचे पुढचे इमले रचले गेले आहेत. इंग्रजीत ज्याला Towering Success म्हणतात, तसे उत्तुंग यश आपल्या पेठांनी कमावले आहे.

यंदा पेठांचे ४३ वे वर्ष. मधल्या दोन वर्षांच्या अपरिहार्य विरामानंतर यंदा गोरेगावपासून सुरू झालेल्या पेठ पर्वाचे आपण जंगी स्वागत करूया. 'पेठ समिती'ला भरघोस शुभेच्छा देऊया.

पेठ हा उत्पादक व विक्रेत्यांसाठी व्यवसाय आहे. ग्राहकांसाठी खरेदीचा व्यवहार आहे. पण आयोजनासाठी अखंड मेहनत करणारी समिती मात्र Profession नाही तर Passion म्हणून हा सारा खटाटोप करत असते. या सर्व आयोजनात शिस्त, तत्परता, नेटकेपणा, नियोजन कुशलता, कल्पकता असे सर्व व्यावसायिक गुणधर्म आहेत, तरीही कमर्शियल बाज नाही. पेठेतील व्यावसायिकांना उचित मोबदला मिळेल, हे पाहिले जाते पण अवाजवी नफेखोरी होणार नाही याची काळजी घेतली जाते. एखादी वस्तू सदोष आढळल्यास परत करण्याची सुविधा आहे, प्रत्येक व्यवहार उचित होण्यासाठी पावतीची सक्ती आहे. पर्यावरणाचे भान राखण्यासाठी प्लॅस्टिक कॅरी बॅग्सना इथे मज्जाव आहे.

इथे आपल्या मुंबई ग्राहक पंचायतीतर्फे ग्राहकांना वाटपातील काही चिजांची झलक पहायला मिळते. ग्राहकांना उपयुक्त अशी माहिती देणारे दालनही असते.

पेठेत आपल्या कार्यकर्त्यांचा सजग वावर असतो. सर्व काही आलबेल आहे ना, याकडे त्यांची करडी नजर असते आणि तीच नजर आपल्या जुन्या सभासदांना, कार्यकर्त्यांना हेरून त्यांचे स्वागतही करत असते. आपल्या संस्थेशी जुना अनुबंध असलेल्यांचे स्नेहमीलनही या पेठेच्या प्रांगणात सहजपणे घडून येते.

आपल्या पेठेत काही दालने ही समाजोपयोगी संस्थांना विनाशुल्क दिली जातात. एखाद्या अशा दालनाला मदत म्हणून आपले कार्यकर्ते स्वतः पुढे सरसावून तो स्टॉल चालवतात. कामाची आस व समाजशीलतेची असोशी असलेले कार्यकर्तेच हे करू जाणे!

आता गणपतीनंतर दिवाळीपर्यंत मुंबई–ठाण्यात लागोपाठ पाच पेठांचा उत्सव सुरू होतोय. आपण ज्यांची वाट बघतो असे जुने स्टॉल्स आहेतच पण सुमारे ५० दालने नवी आहेत. पारंपरिक दागिने, वस्त्रप्रकार तर आहेतच, पण नव्या युगाच्या नव्या प्रकारांनीही या पेठा सजलेल्या दिसतील.

मॉलमध्ये मिळणाऱ्या विदेशी वस्तूंना शह देतील अशी स्वदेशी, सुंदर उत्पादने आपल्या पेठेत घेता येतात.

परंपरा आणि नवता, व्यावसायिकता आणि आपुलकी, कल्पकता आणि नाविन्य, उचित व्यवहार आणि विश्वासार्हता– अशा मूल्यांचा मिलाफ म्हणजे मुंबई ग्राहक पंचायत पेठ!

**– शुभदा चौकर**

# पालघर पंचायत पेठ उत्साहात संपन्न

**– विजय सावे,**
*पालघर विभाग*

**मुं**बई ग्राहक पंचायत, पंचायत पेठ समिती, आयोजित, पालघर पंचायत पेठ ५ ते १० ऑगस्ट रोजी लायन्स क्लब हॉल, कचेरी रोड पालघर येथे संदेश चुरी यांच्या नेतृत्वाखाली यशस्वीरित्या उत्साहात संपन्न झाली.

शैक्षणिक, सामाजिक, कृषी क्षेत्रात भरीव योगदान दिलेले ज्येष्ठ व्यक्तिमत्व सुधीर दांडेकर यांच्या हस्ते पेठेचे उद्घाटन झाले.

कार्यक्रमाची सुरुवात पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून झाली. या वेळी पंचायत पेठ समिती प्रमुख अनुराधा देशपांडे, विभागाचे कार्याध्यक्ष संदेश चुरी, वितरणाचे कार्याध्यक्ष दीपक भंडारी, मुंबई ग्राहक पंचायतीचे खजिनदार रविंद्र सहस्रबुध्दे, पेठ समिती सदस्या अनघा आचरेकर, प्रीती कोळंबकर, शिक्षण विभाग प्रमुख मंगला गाडगीळ, वृषाली आठल्ये, पालघर विभाग व पालघर वितरण कार्यकारिणी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे स्वागत व प्रास्ताविक पालघर विभागाचे कार्याध्यक्ष संदेश चुरी यांनी केले. अनुराधा देशपांडे यांनी पेठे आयोजनामागील भूमिका विशद केली. दीपक भंडारी यांनी पेठेला शुभेच्या देताना विभागातील कार्यकर्त्यांच्या कामाचा व परिश्रमाचा उल्लेख केला.



सुधीरभाऊ दांडेकर यांनी आपल्या मिश्किल शैलीत पेठेच्या आयोजनात घ्यावयाची काळजी ह्यावर छान मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे आभार कार्यवाह सुनंदा तोडणकर यांनी मानले.

कार्यकर्त्यांचा स्टॉलधारकांशी असलेला संपर्क तसेच सर्व कार्यकर्त्यांमधील समन्वय, पेठेचा सोशल मिडिया, वृत्तपत्रे, बॅनर व ऑटो रिक्षाद्वारे केलेला सुंदर प्रचार ह्यामुळे पेठ यशस्वी झाली. बोईसर विभागानेही भरीव कामगिरी केली. कार्यकर्त्यांचा उत्साह व अंगावर पडेल ते काम करण्याची तयारी वाखाणण्याजोगी होती. लायन्स क्लब ऑफ पालघर यांनी पुरविलेल्या सोयी–सुविधा आणि आरोही कॅटरर्स ह्यांचेही मोलाचे योगदान लाभले. विभागाच्या कार्यकर्त्यांनी चालविलेला SVRR (ताडदेव) या सामाजिक संस्थेचा स्टॉलही देखणा होता आणि त्यांची विक्रीही उत्तम झाली.

पालघर पंचायत पेठेची एकूण उलाढाल रु. सुमारे ७६ लाख इतकी झाली.

♦

## कलात्मक कार्यशाळा

मुंबई ग्राहक पंचायत पालघर पंचायत पेठ ६ ते ९ ऑगस्ट या काळात दररोज संध्याकाळी ४ ते ६ या वेळेत विविध कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. यात वारली कला, मातीकाम–शाडूची गणेश मूर्ती तयार करणे, कागदी पिशव्या तयार करणे तसेच 'टाकाऊतून टिकाऊ वस्तू तयार करणे' यांचा समावेश होता. यासाठी प्रफुल्ल घरत, भास्कर खेडकर, कृष्णकांत गडग व हेमंत चामरे या कलाकारांचे सहकार्य मिळाले. कार्यशाळेतील प्रत्येक सहभागी विद्यार्थ्याला कॅम्लिन कंपनीकडून भेटवस्तू देण्यात आली. याकामी अजित राणे (मॅनेजर, कॅम्लिन प्रा.लि.) व माधुरी वर्तक यांचे सहकार्य मिळाले. आपल्या शिक्षण विभागात काम करणार्या पालघरच्या प्रतिक्षा पाटील व गौरांगी पाटील यांचे विशेष सहकार्य मिळाले. सर्व कार्यशाळेचे नियोजन विनय पाटील यांनी केले. त्यांना सर्व कार्यकारीणीने मदत केली. या कार्यशाळेचे वैशिष्ट्य म्हणजे बाल ग्राहकांचा लाभलेला उत्स्फूर्त प्रतिसाद. त्यामुळे मुलांना पर्यावरण रक्षणाचे नवे मार्ग कळले. शिवाय त्यांचे पालक त्या वेळेत पेठेत निवांत खरेदी करू शकले.

# गोधडी - जतनशील संस्कृतीचे प्रतिक

– **अनुराधा देशपांडे**
*अध्यक्ष, पंचायत पेठ समिती*

**ग्रा**हक पंचायत पेठांचे यंदाचे खरेतर ४४ वे वर्ष. १९७८ सालापासून सुरू झालेला हा उपक्रम गेली ४२ वर्षे अव्याहतपणे चाललेला आहे. २०२० आणि २०२१ ह्या दोन वर्षात 'कोरोना' परिस्थितीमुळे ह्या पेठांच्या आयोजनात खंड पडला. सक्तीची विश्रांती घ्यावी लागली. ह्या सक्तीच्या विश्रांतीनंतर परत नव्या उत्साहात, नव्या जोमाने हा उपक्रम उत्तुंग भरारी घेत आहे. २०१९ ह्या वर्षात एकंदर १२ ठिकाणी पंचायत पेठांचे आपण आयोजन केले. नवी ठिकाणे, नवे ग्राहक आणि नवे गाळेधारक हा त्रिवेणी संगम साधत ह्या उपक्रमाने समाजमान्यतेचे एक वेगळे प्रारूप नोंदवले. मधली २ वर्षे मात्र कसोटीची होती.

इथेही अत्यंत शांतपणे, संयमाने, कोणत्याही स्पर्धेत न उतरता आपण योग्य वेळेची वाट बघत होतो. २०२२ वर्ष मात्र आपल्या सर्वांसाठी आशेची नवी पालवी घेऊन उजाडले. थोडी संभ्रमावस्था होती पण कार्यकर्त्यांची जिद्द आणि संस्थेचा कार्यकर्त्यांवरचा विश्वास ह्या जोरावर आतापर्यंत पुणे, दापोली, गोरेगाव, पालघर येथे अत्यंत यशस्वीपणे पेठा संपन्न झाल्या. पंचायत पेठांचा एक टप्पा पूर्ण झाला. आता सप्टेंबर पासून दुसऱ्या टप्प्याला सुरुवात होईल. नवे गाळेधारक नव्या कल्पना आणि नवे ग्राहक आपल्याबरोबर असतील. नवी उत्पादने, नवी ठिकाणेसुध्दा असतील.

आज आपल्या संस्थेचा विस्तार डहाणू, पालघर, वसई पासून ते मुंबई, पुणे, ठाणे, रायगड, रत्नागिरीपर्यंत सर्व दूर पसरला आहे. हे सगळे जिल्हे, विविध प्रांत एकमेकांना जोडत होणारा संस्थेचा हा विस्तार एखाद्या मऊसूत नक्षीदार पांघरुणासारखा वाटतो. मऊशार वस्त्राचे तुकडे जोडून जसे ऊबदार पांघरूण तयार होते आणि आपले थंडी वाऱ्यापासून रक्षण करते, तसेच बाजारातील अनुचित प्रथांपासून, फसवणूकीपासून ग्राहकाचे संरक्षण करण्यासाठी हा संस्थेचा विस्तार. वेगवेगळे जिल्हे, गावे जोडत आज मुंबई ग्राहक पंचायतीचे हे ऊबदार नक्षीदार पांघरूण विणले गेले आहे.

मुळात तुकडे तुकडे जोडत नवनिर्मिती करणारी ही गोधडी. आज आपल्या पंचायत पेठेत अनेक स्टॉलवर विविध प्रकारच्या गोधड्या ग्राहकांसाठी उपलब्ध असतील. 'रुरल ते ग्लोबलपर्यंत' विस्तारलेली ही गोधडी. पूर्वी अत्यंत गरीब आणि गरीबीचे निदर्शक असणाऱ्या ह्या गोधडीला आज अगदी परदेशांतही मान्यता मिळाली आहे. जेव्हा पंचायत पेठांच्या ह्या दालनावर नजर टाकली तेव्हा जाणवले अरे आपल्याकडे किती वैविध्यपूर्ण हा प्रकार अवतरलाय. पण मग नक्की ही तीच गोधडी आहे का? की जिला गरिबीचे वस्त्र म्हणून थोड्या नाखुशीने पाहिले जायचे. आज तीच दिमाखांत विराजमान झालेय. मग ठरवलं ह्या गोधडीचा थोडा इतिहास आपल्या ग्राहकांपर्यंत पोहोचवायचाच आणि ह्या गोधडीच्या खरेदीची रंगत वाढवायची. मग डोळ्यासमोर प्रथम क्रमांकावर आली ती दासोपंताची 'पासोडी', संत दासोपंत, संत सर्वज्ञ नाथपंचकांमधील एक सर्वश्रेष्ठ संत. दासोपंत श्री दत्तात्रयांचे परमभक्त होते. दासोपंत मराठी वाङ्मयातील सर्वश्रेष्ठ संत कवी मानले जातात. विपुल साहित्य संपदा असलेल्या दत्तभक्त दासोपंतांची 'पासोडी' म्हणजे मराठी साहित्याच्या दालनांतील अपूर्व असे लेणे आहे. प्राचीनकाळी पांघरण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या जाड्या भरड्या कापडास 'पासोडी' म्हणत असत. ४० फूट लांब आणि चार फूट रूंद अशा कापडावर दासोपंतांनी विशिष्ट चित्रमय शैलीत लिहिलेले काव्य म्हणजे 'दासोपंतांची पासोडी'. एकमुख षट्भुजाधारी दत्तमूर्तीच्या आधारे त्यांनी चित्रात ओव्या गुंफल्या आहेत. सव्वा लाख ओव्यांच्या माध्यमातून गीतेवर केलेली टीका आणि तीही कापडावर असे ह्या पासोडीचे स्वरूप किती विलक्षण आणि दैवीच म्हणावी अशी ही कलाकृती. ह्यावरून एक लक्षात येते की वस्त्रावर वेगवेगळ्या पद्धतीने रेखाटन करून भाव व्यक्त करण्याची ही परंपरा प्राचीन, कधी वस्त्रावर अध्यात्म अवतरले तर कधी निसर्ग बोलका झाला. सुरुवातीला केवळ पांघरायचे

जाडेभरडे वस्त्र म्हणून असलेली ही पासोडी. त्यानंतर ह्याच मूळ संकल्पनेतून वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या नावाने हिचा आविष्कार झालेला आपल्याला दिसतो.

पासोडीचे वेगळे रूप म्हणजे गोधडी. गोधडी म्हटली की डोळ्यासमोर येते आई-आजीची माया. मायेची ऊब, मायेची सावली. गोधडी म्हणजे मायेच्या कापडाचे तयार केलेले पांघरूण.

भारतीय संस्कृती तशी जतनशील. वापरा आणि फेकून द्या! ह्या पाश्चात्य संस्कृतीच्या अगदी विरुध्द, वाचवा आणि जतन करा. आणि म्हणून जुनी झालेली आई-आजीची मऊसूत सुती साडी, आजोबांचे धोतर तिचा जीर्ण झालेला भाग वगळून धडका भाग अतिशय कलात्मकतेने एकमेकांना जोडला जायचा. त्यातल्या त्यात रंगसंगती, कलाकुसर साधली जायची. अशा गोधडीतून सासरी आईची माया शोधणारी सासुरवाशीण आपल्याला दिसते. पूर्वीच्या काळी घरातले कामधाम झाले की अंगणात सुखदुखाःच्या गोष्टी करत स्त्रीवर्ग गोधडी शिवण्याचे काम करी. घरातल्या जुन्या कपड्यांचे तुकडे एकमेकांना जोडत हे शिवणकाम चाले. धागा कसला तर वाणसामान बांधून आलेल्या पुड्यांचा दोरा. गरीबाघरी पांघरायला ह्या गोधड्याच असायच्या. आर्थिकदृष्ट्या थोडा वरचा वर्ग काही प्रमाणात चादरी वापरे. पण सर्वसामान्य घरात घोंगडी आणि आतून लावलेली गोधडी हेच खरे उबदार पांघरुण.

जतनशील संस्कृतीचे 'गोधडी' हे उत्कृष्ट उदाहरण. रोजच्या साड्या, धोतरे, मुलींचे परकर-पोलके असे ह्या कपड्यातून वापरून जीर्ण झाले तरी फेकून न देता त्यातून निर्मिती करणारे. तुकडे-तुकडे जोडून केलेले लहान बाळाचे दुपटे, बाळाला आजी-आईची ऊब देते. पारंपरिक गोधडी प्रकारांत गोधडी शिवण्याची एक विशिष्ट पध्दत आढळते. जुने स्वच्छ कपडे व्यवस्थित अंथरुन छोटे-छोटे टाके घातले जातात. ह्याच टाक्यातून विविध नक्षी आकाराला येते. महाराष्ट्रांत ह्याच गोधडीला 'वाकळ' किंवा 'लेपाटी' असेही म्हटले

## गोधडी

गोधडी म्हणजेच
नसतो फक्त चिंध्यांचा बोचका
गोधडी म्हणजेच गोधडी असते.
मायेलाही मिळणारी ऊब असते.
गोधडीला असते अस्तर
बापाच्या फाटक्या धोतराचे
किंवा
आईला बापाने घेतलेल्या
फाटक्या लुगड्याचे
आत-
गोधडीत
अनेक चिंध्या असतात
बसलेल्या दाटीवाटीनं
आईनं दटावून बसवलेल्या.
तेव्हा त्या फक्त चिंध्याच नसतात
त्यात असतो



मामानं घेतलेला, भाच्याचा
जीर्ण कुडता
माहेरातून आलेलं
आईच्या लुगड्याचं पटकुर
आणि
पहिल्या संक्रांतीला
बानं घेतलेलं -
आईनं असंख्य ठिगळं लावलेलं
तिचं लाडकं लुगडं
आणि
बाच्या कोपरीच्या बाह्या
आईनं ते सगळं
स्मृतीच्या सुईनं
शिवलेलं असतं त्यात.
म्हणून गोधडी म्हणजे
नसतो चिंध्यांचा बोचका
ऊब असते ऊब!

**- डॉ. कैलास दौंड**

*(इ. ८ वी मराठी बालभारतीतील ही कविता)*

शांता शेळके यांच्या 'पैठणी' या अजरामर कवितेत आजीची जुनी पैठणी गोधडीची ऊब घेऊन समोर येते, त्यातील हे एक कडवं!

कधीतरी ही पैठणी
मी धरते ऊरी कवळुन
मऊ रेशमी स्पर्शामध्ये
आजी भेटते मला जवळुन
मधली वर्षे गळुन पडतात
कालपटाचा जुळतो धागा
पैठणीच्या चौकड्यांनो
आजीला माझ्या कुशल सांगा

जाते. गुजराथमध्ये ही 'दोहर' होते तर उत्तर प्रदेशांत ही रजई होते. गादीसारखीच पण सॅटीनची खोळ करून आत पातळ कापूस भरला जातो. कन्नडात ह्याला गादी किंवा खोदबक (Khudbahak) म्हणतात. तर वेस्ट बेंगालमध्ये ही 'कांथा' नावाने अवतरले. कांथा ही एक प्रकारची भरतकामाची हस्तकला आहे. ही पश्चिम बंगाल त्रिपुरा आणि ओरिसा ह्या भारतीय राज्यांमध्ये आढळले. ओरिसात जुन्या साड्या एकमेकांवर रचल्या जातात आणि हाताने शिवून पातळ तुकड्याचे वस्त्र तयार होते. हे पलंगावर पसरण्यासाठी चादरीसारखे वापरतात. Bedspread काथांची शिलाई साधी रजई बनवण्यासाठी वापरली जाते त्याला नक्षी कांथा म्हणतात. बंगालमधील ह्या कलेत जुन्या साड्यांचा वापर करून कांथा शिलाईने (धावदोरा असलेला टाका) घालून हलके ब्लँकेट, बेडस्प्रेड बनवतात. विशेषतः लहान मुलांसाठी अंथरूण म्हणून वापर केला जातो. ग्रामीण महिला कांथा भरतकामाचा पारंपरिक प्रकार मऊ धोत्यांसाठी करायच्या ज्याला लेपकंठा किंवा सुजनी कंठा म्हणूनही ओळखले जाई असे म्हणतात. कांथा हा प्रकार ५०० वर्षे जुना आहे.

गोवा हे महाराष्ट्राला लागून असलेले स्वतंत्र राज्य. महाराष्ट्रासारखीच इथेही हाताने शीवलेली गोधडी प्रसिद्ध. जुन्या किंवा नवीन कापडाचे तुकडे जोडून विविध डिझाईन्सच्या गोधड्या बनवल्या जातात. रांगोळी सारखी वैविध्यपूर्ण डिझाईन्सची रचना असणाऱ्या गोधड्या, पॅचवर्कच्या गोधड्या इथल्या प्रसिध्द किंबहुना महिला रोजगाराचे उत्तम साधन म्हणून गोव्यात सरकारकडूनही प्रोत्साहन दिले जाते. ह्यासाठी महिलांना प्रशिक्षणासाठी विविध कार्यशाळांचे आयोजन केले जाते.

मायेचे प्रतिक असलेली ही गोधडी, ही कला आज लोप पावत चालली आहे. तिचे पुनरूज्जीवन होऊन आज ती क्विल्ट म्हणून पुढे येतेय. जागतिक स्तरावर सुध्दा मूळ संकल्पनेला धरून त्यात बदल होताहेत. हस्तकलेऐवजी मशीनवर शिवली जात आहे. जुन्या वापरलेल्या कपड्यांऐवजी नवीन आकर्षक रंगसंगती साधत मुद्दाम अखंड वस्त्राचे तुकडे करून त्यातून कलात्मकतेने रचना करून 'क्विल्ट' साकारली जात आहे. काहीही असो गोधडी म्हणजे मायेचे वस्त्र, जतनशील संस्कृतीचे प्रतिक, एकमेकांना जोडून ठेवणाऱ्या विचारांचे तुकडे आणि धागे घेऊन विणलेले वस्त्र.

आपल्या पंचायत पेठेत आपणास ह्या गोधडीचे विविध प्रकार बघायला मिळतील. फक्त खरेदी करतांना त्या मागचा विचार, कल्पना माहीत असेल तर ती एक वस्तूची खरेदी न होता त्याला भावनिक ऊब येईल एवढेच.

पंचायत पेठेचे आयोजन म्हणजेही अनेक रंगांचा मेळ! विविध स्टॉल्स, पारंपरिक व आधुनिक उत्पादने, शिक्षण विभागातर्फे प्रबोधन, सामाजिक संस्थांचे स्टॉल्स सगळे मिळून पेठेत रंग भरत असतात. या साऱ्या मेळ्याचे संयोजन आपले निरलस कार्यकर्ते करत असतात. कुठेही रंगाचा बेरंग होऊ नये म्हणून ते सतर्क असतात.

कार्यकर्त्यांच्या समजूतदार व मदतशील वृत्तीमुळे स्टॉलधारकांनाही स्नेहशीलतेचा अनुभव येतो. खरेदीदार फार विश्वासाने इथे खरेदी करतात. परस्परांना भेटतात. आपल्या पंचायत पेठा ऊबदार वातावरणात पार पडतात. अशा या पंचायत पेठांना आपल्या सर्व ग्राहकांनी आवर्जून भेट द्यावी ह्यासाठी आग्रहाचे निमंत्रण.

♦

**हा अंक पंचायत पेठ विशेषांक असल्याने स्मार्ट होम, आरोग्यदायी जीवनशैली, घरातली बाग, अर्थवेध ही नियमित सदरे जागेअभावी प्रसिद्ध होऊ शकली नाहीत.**

# आपल्या वाटपात खपली गहू

– छाया वारंगे

**ख**पली गहू आपल्या अन्नाचा भाग असावा असे अनेकांकडून आजकाल सातत्याने ऐकायला मिळते. परंतु तो किंमतीने जास्त आहे. त्यात हा गहू लालसर असल्याने पोळी-चपातीचा रंगही लोभसवाणा गोरा नाही. त्यामुळे ग्राहकांचा कल त्याकडे नाही.

खपली या नावातच गव्हाबद्दलचे सर्व काही आहे. हा गहू लांबट, लालसर व आवरण खपलीसारख्या जाड पापुद्र्याचा असतो. मात्र चवीला अत्यंत मधुर. त्याचे उत्पादन क्षेत्र मुळात कमी आहे. कारण याचे पीक सेंद्रीय पद्धतीनेच घ्यावे लागते. अर्थात त्यामुळेच पुष्टीदायी, तंतूनी समृद्ध व प्रोटीन्सने समृद्ध आहे. याने भूक नियंत्रणात राहते, त्यामुळे वजन नियंत्रणात ठेवण्यासाठी अनेकदा आहारतज्ज्ञ खपली गव्हाचा समावेश अन्नात करण्याचा सल्ला देतात. खपली गव्हातील मॅग्नेशियम, लोह व अन्य पोषक घटकांमुळे कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रणात राहते.

आपल्या अनेक सभासदांची खपली गव्हाची मागणी होती. वाशी मार्केटमध्ये खपली गहू उपलब्ध होताच, परंतु घाऊक खरेदीवर रु. १०० आणि पुढे अगदी १३० प्रति किलो होता.

सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर्स प्रा. लि. या शेतकरी संघटीत कंपनीशी संस्थेचा संपर्क झाला आणि थेट शेतकरी ते ग्राहक या तत्वाने आपण या कंपनीकडून खपली गहू



खरेदी केला. या कंपनीने आपल्याला खरेदी दर प्रतिकिलो रु. ७५ दिला. थेट शेतकऱ्यांकडून गहू आपल्याकडे आला, ही आनंदाची बाब. सभासदांचा उत्तम प्रतिसाद मिळाल्यास अशी थेट खरेदी करता येईल. ♦

# आखूड पैठणीची दीर्घ कहाणी

तक्रार अशी सुटली....

– नीता पै, *मालाड*

**मा**झ्या साठाव्या वाढदिवसानिमित्त कन्येने ऑस्ट्रेलियातून पैठणी ऑनलाइन बुक केली व १४ एप्रिल २०२२ रोजी ठाण्यातील एक प्रसिद्ध शोरूमने ती माझ्या मालाडच्या पत्त्यावर पाठवलीसुद्धा. पैठणी नेसून बघताना त्या पैठणीची लांबी कमी वाटली. मोजली तर ती फक्त ५ मीटर इतकी आढळली, सोबत एक ब्लाउज पीस.

पैठणी साड्या ६ यार्ड आणि १ यार्ड ब्लाउज पीसमध्ये येतात. आता ही पैठणी लांबीने लहान आहे, असे मी मुलीला कळवले. प्रेमाने पाठवलेल्या साडीबाबत अशी खोट निघाली, याचे मुलीलाही वाईट वाटले. ५०० ऑस्ट्रेलियन डॉलर देऊन घेतलेल्या या साडीमुळे सगळे नाराजीनाट्य झाले. साडी दुकानाने त्यांची साडी परत घ्यावी आणि रक्कम परत करावी, म्हणून मी त्यांच्या ग्राहक सेवा केंद्राकडे तक्रार कळवली. त्यांनी तक्रारीची पोच देखील दिली नाही. पराग रेडकर (ग्राहक पंचायत, गोरेगाव) यांच्याशी संपर्क साधून मग ही तक्रार गोरेगाव तक्रार मार्गदर्शन केंद्राचे कार्यकर्ते उदय चितळे यांना पाठवली.

तात्काळ उदय चितळे (यांनी अमेरिकेत बसून) त्या शोरूमच्या ग्राहक सेवा केंद्राला माझी तक्रार कळवली. तरीही ग्राहक सेवा केंद्र दाद द्यायला तयार नव्हते. पण ग्राहक पंचायतीचे कार्यकर्ते एखाद्या तक्रारीचा निपटारा झाल्याशिवाय गप्प बसत नाहीत. चितळे यांनी वजन माप निरीक्षक यांच्याकडे माझ्यावतीने तक्रार दाखल केली.

*(पान ११ पाहा...)*

# मुलायम, तलम वस्त्रप्रकार

**ह्या** वर्षी पंचायत पेठेत वस्त्रांचे विविध प्रकार ग्राहकांसाठी उपलब्ध असतील. आत्तापर्यंत असलेल्या पारंपरिक वस्त्रांबरोबरच सध्या नवीन आढळणारे मोडाल सिल्क आणि मल कॉटन. हे नेमके आहे तरी काय?

**मोडाल सिल्क –** हा लाकडाचा लगदा वापरून केलेले सेल्युलोसिक फायबर आहे. जो करंजाच्या (Beech) झाडांच्या अर्कापासून बनवला जातो. करंजाच्या झाडांपासून काढलेले सेल्युलोज हाताने फिरवले जाते, जेणेकरून ते सुंदर मोडाल रेशीम फॅब्रिक बनते.



कापसापेक्षा मऊ मोडल सिल्क हा अधिक पर्यावरणपूरक पर्याय आहे, असे मानले जाते. कारण या उत्पादनात १० ते २० पट कमी पाणी लागते आणि त्याच्या वाढी व पोषणासाठी जमीन देखील कमी लागते.

मोडाल कापसापेक्षा तुलनेने अधिक महाग आहे. कारण सेल्युलोज फायबरमध्ये करंजा वृक्षाच्या लाकडावर प्रक्रिया करणे अधिक महाग असते.

**मल कापूस –** हा कापसाचा सर्वात मऊ, हलका प्रकार आहे. याची निर्मिती सुती तंतूपासून केली जाते. त्यापासून मल कापड बनवले जाते. मल कापड (कॉटन) हे मूलतः बंगालमधले. या वस्त्राला व्यवस्थित झटकून सुकत घातले की त्याला इस्त्रीची गरज भासत नाही. प्रत्येक धुण्यानंतर उत्तरोत्तर हे मऊ होत जाते. फक्त धुताना हे भिजत न घालता पटकन धुऊन सुकत घालावे लागते.

हे कापड त्वचेवर मुलायम वाटते. प्रामुख्याने उष्ण हवामान असलेल्या प्रदेशात याचा वापर केला जातो. या कापडाची ओळख म्हणजे कपडा हलका आणि पातळ असतो. प्रत्येक धुण्यात (वॉश) मध्ये हे मऊ होते.

**तलम मलमल –** जवळजवळ १०० वर्षापूर्वी बंगाली विणकरांनी पहिल्यांदा मलमल हे वस्त्र विणले. अतिशय तलम आणि मऊसूत असे हे मुलायम मलमल वापरण्यास उत्तम. प्रत्येक धुण्यानंतर ते आणखीन मुलायम होते.

पेठेतील आणखी काही वस्त्रप्रकारांची माहिती इंग्रजी पानांवर वाचा. ♦

## ऊब

नावातच ऊबदारपणाची जाणीव देणारा एक नवीन स्टॉल यंदा आपल्या पंचायत पेठेत प्रवेश करत आहे.



देवरूख येथे स्नेह परिवार ही संस्था हातशिलाईच्या पण सुबक टाक्यांच्या नक्षीदार, ऊबदार, मोठ्या व लहान गोधड्या उत्पादित करते. कोरोना काळातील लॉकडाऊन दरम्यान देवरूख आणि आसपासच्या परिसरातील महिलांना रोजगार उपलब्ध व्हावा, या विचाराने उचललेलं हे पाऊल!

आपल्या साथीने यांचा प्रवास अधिक दमदार व्हावा, यासाठी सज्ज होऊया!

*(...पान १० वरून)*

## आखूड पैठणीची दीर्घ कहाणी

मोबाइलवरून संबंधित खात्याकडे पाठपुरावा सुरूच ठेवला. अखेर एक वजन-माप खात्यातील अधिकारी त्या शोरूममध्ये गेले व उपस्थित अधिकाऱ्यांना त्यांनी फैलावर घेतले. दुसऱ्याच दिवशी त्यांचा कर्मचारी मेजरिंग टेप घेऊन घरी हजर झाला. पैठणीची लांबी मोजून, पैठणीची लांबी कमी आहे, असे वरिष्ठांना त्याने कळवले, आणि पैठणी परत घेऊन गेला.

दुसऱ्याच दिवशी ५०० डॉलर (रु. २४९५०/- जी एस टी सकट) त्या शोरूमने आमच्या खात्यावर जमा केले. उदय चितळे यांचे आभार.

♦

वाचू आनंदे

**ऑक्टोबर २०२२ च्या वाटपातील पुस्तक**

- ***युक्तीच्या गोष्टी सांगणाऱ्याची गोष्ट****; प्रकाशक :* ग्रंथाली प्रकाशन; *लेखिका –* शिल्पा शिवलकर; *छापील किंमत : ३००/-रु.; वाटपातील किंमत : २००/-रु.*

# युक्तीच्या गोष्टी सांगणाऱ्याची गोष्ट

**स**रकारी काम आणि सहा महिने थांब, अशी एक म्हण आहे. एकूण शासन यंत्रणेला 'सुस्त अजगर' म्हणूनसुद्धा संबोधिले जाते. मात्र आपल्या अभ्यासपूर्ण आणि वस्तुस्थितीवर आधारीत युक्तिवादाने, खोडता येणार नाहीत अशा मुद्यांच्या सहाय्याने या यंत्रणेला योग्य निर्णय घ्यायला भाग पाडणारा 'देव' माणूस म्हणजे जयंत देव.



चिकाटी, सातत्य, कामाप्रती निष्ठा आणि सत्याची कास धरून चालण्याचे जणू व्रत, यामुळे जयंत देव अनेकांना देवदूतासारखे वाटतात. आज पंच्याहत्तरी पार केलेल्या जयंत देवांचे बालपण गरिबी आणि कष्ट यांनी भरलेले होते. स्वतःच्या बुद्धिच्या बळावर शिष्यवृत्ती मिळवून त्यांनी इंजिनियरिंगची पदवी मिळवली. सुरुवातीस सरकारी आणि नंतर ब्रिटानिया ही शिस्तबद्ध कंपनी यांचा अनुभव त्यांनी डोळसपणे घेतला. कठीण प्रसंगात त्वरित निर्णय घेण्याचे कौशल्य विकसित होत गेले. आत्मविश्वास दुणावला. ब्रिटानियाच्या मुंबई महाव्यवस्थापकांनी त्यांच्याविषयी म्हटले, 'हा एक हाडाचा इंजिनियर आहे. याची बांधिलकी ब्रिटानियाशी नव्हे तर इंडस्ट्रीयल इंजिनियरींगशी आहे'. त्यांनी पुढे सल्लागार म्हणून विविध उद्योगांना जो बहुमोल सल्ला दिला आणि मार्गदर्शन केले, ते मुळातून वाचताना, हे बोल सार्थ वाटतात.

कष्टाचा पैसा घालून उद्योग उभा करू पाहणारे लाच देणार नाहीत, असे ठासून सांगून तो व्यवसाय उभा करण्याची किमया त्यांनी केली. विविध उद्योगांना समस्येतून बाहेर काढण्यासाठी युक्तीच्या गोष्टी सांगितल्या, अडचणींवर मात करण्याचे अभ्यासपूर्ण उपाय अवलंबिले आणि त्यातून सल्लागार म्हणून आपले स्थान कसे निर्माण केले याचे अनुभव वाचनीय आणि स्फूर्तीदायक ठरतील.

कोणत्याही प्रश्नाला कूट-प्रश्नासारखे भिडण्यात, त्यासाठी लागेल ते सगळे संदर्भ शोधून कार्य-कारण भाव सिध्द करण्यात त्यांना रस होता. त्यामुळे त्यांनी विविध प्रकारच्या उद्योगांना पाठबळ दिले. तसेच ते मुंबई ग्राहक पंचायतीसारख्या चळवळीला सुद्धा दिले. १९८४ मध्ये मा. गंगाधरराव गाडगीळ संस्थेचे अध्यक्ष असताना जयंत देव संस्थेच्या कामाशी जोडले गेले. ग्राहकांच्या दृष्टीने ज्वलंत ठरणाऱ्या प्रश्नांची तड लावण्यासाठी सुद्धा अभ्यास आणि संशोधन करून बाजू मांडण्याची आवश्यकता त्यांनी पटवून दिली. उपनगरी रेल्वेची दरवाढ/एसटी दरवाढ यावर संस्था काम करीत असताना एसटी, रेल्वे यांचा वार्षिक अहवाल व ताळेबंद तपासणे, आकडेवारीच्या आधारे बोलणे, यामुळे अधिक प्रभाव पडतो, हे देवांमुळे आमच्या लक्षात आले, असे अप्पासाहेब गोडबोले, या आपल्या संस्थापक सदस्यांनी नमूद केले आहे. अशोक रावत हे संस्थापक म्हणतात, 'देवांच्या मांडणीचं वैशिष्ट्य म्हणजे ते केवळ प्रवासीच नव्हे तर धोरणकर्त्यांच्या बाजूनेही विचार करून आपली भूमिका मांडत'. सरकारी धोरण आणि नियोजन यांचा सखोल अभ्यास ते करीत.

एसटी भाडेवाढीचा अभ्यास झाल्यावर मुंबई ग्राहक पंचायतीने सुचविले की अहवाल करण्याऐवजी वृत्तपत्रासाठी लेख लिहावेत. 'लोकसत्ता'त आलेल्या सात लेखांच्या मालिकेने सामान्य एसटी प्रवासी आणि सरकार दोघांनाही जागे केले. पुढे काय झाले ते मुळातून वाचायला हवे. त्यानंतर वीजदर निश्चिती, वीज विषयक कायदा आणि वीज नियामक, देशभरातील विजेचे आंतरराज्यीय वहन नी त्यासाठी एनर्जी एक्स्चेंज सारख्या यंत्रणेची मुहूर्त मेढ असे प्रचंड काम, त्यांनी केले. वीज ग्राहकांसाठी त्यांनी दिलेले योगदान बहुमूल्य आहे.

अशा या व्यक्तीच्या 'युक्तीच्या गोष्टी' हे पुस्तक सर्व ग्राहकांनी संग्रही ठेवावेस असे आहे.

**– वसुंधरा देवधर**


कन्या डिझाईनर्स ज्वेलरी
एथनिक फॅब्रिक ज्वेलरी
दिया क्विल्ट
फोन चार्जर, सौंदर्य प्रसाधने, साडी-ब्लाऊज इ. आकर्षक फोल्डर तसेच रजया इ.
शीलाताई फूड प्रॉडक्ट
प्रिझर्वेटीव्हज् न वापरलेली उत्पादने. केशर वेलची सिरप, आले लिंबु पाचक इ. आवळ्याची उत्पादने
आबंध
वारली पेंटींग केलेले सिल्क कुर्ते, ड्रेस मटेरिअल
महावीर क्रोकरी
फॅन्सी क्रोकरी
शलाका कलेक्शन
लखनऊ कुर्ती, ड्रेस मटेरियल
प्रेशिया
वाळलेला कांदा, पुदिना, टोमॅटो, शेवगा पावडर इ.
बियाँड फ्रेम्स
सुकलेल्या पानांफुलापासून बनवलेल्या शोभिवंत फ्रेम्स
कर्णिक कृषी उद्योग
गुलकंद तसेच शेजवान सॉस, हार्टीका चटणी
पॅकेम् टोट बॅग्ज ॲण्ड वॉलेट
वॉलेट्स, टोट बॅग्ज, डेनिम बॅग्ज
स्वरूपम
विविध प्रकारच्या पर्सेस, बॅग्ज.
वृषांक होम डेकॉर
डेकोरेटिव्ह वस्तू
विश्वास
भिन्नमती मुलांनी तयार केलेल्या कलाकृती
डेको व्हिले
विविध प्रकारचे पाऊच, वॉलेट, बॅग्ज इ.
प्रथम डेकॉर
कॅन्डल स्टॅन्डस्
सूचना:
रंगीत चित्रे
प्रत्यक्ष उत्पादनांची नसून
प्रातिनिधिक आहेत
एस.के. एंटरप्रायझेस
फाल्डिंग टेबल.
महालक्ष्मी एन्टरप्राइजेस्
चमचे, सुऱ्या, पळ्या, किसणी, पोळपाट लाटणे इत्यादी
अनंत बुक सेलर्स
कथा कादंबऱ्या, संत साहित्य, बाल साहित्य इत्यादी
२०२२
ग्राहक जाणीव जागृती व सक्षमीकरणासाठी संस्थेच्या स्वयंसेवी कार्यकर्त्यांनी चालविलेला खास उपक्रम
JAGO GRAHAK JAGO
चेतना स्टील
स्टील भांडी व उपकरणे
वैशाली चप्पल
श्री विनायक एन्टरप्राएजेस
साफसफाईसाठी लागणारे विविध ब्रश, स्पंज इत्यादी
फॅशन क्युरा ज्वेलरी
टेरा-कोटा ज्वेलरी
इशानी लिनन्स
मिशरू बेडशीटस्, हिमरू शॉल इ.
आरतीज् बॅग
हॅण्ड पेंटेट पर्सेस, बॅग्ज, स्टोल्स, कंदील, फोल्डिंग पिशव्या
श्री महालक्ष्मी आर्टस्
पारंपरिक व ॲण्टिक ज्वेलरी
रंगोली क्रिएशनस्
फोल्डिंग रांगोळ्या आणि चौरंग
शांतीवन
कुष्ठरोग निवारण आश्रमातर्फे उत्पादित वस्तू
सदगुरू
दिव्यांग मुलांनी तयार केलेल्या वस्तू
नेत्रदान
आधार
गतिमंद मुलांनी उत्पादित केलेल्या वस्तू
विवेक बांबू
बांबूच्या वस्तू, औषधी रोपे
SVRR ताडदेव
दिव्यांग कलाकारांनी केलेल्या वस्तू

## ग्राहक पंचायत पेठ २०२२

**स्वामिनी साडी**
विविध साड्या

**सोहानी क्रिएशन**
विविध प्रकारचे गाऊन

**दिनेह कलेक्शन**
इरकली, पुणेरी, इंदुरी साड्या

**अनंदा क्रिएशन**
वैविध्यपूर्ण डिझाईनचे ब्लाऊज, मधुबनी, कलमकारी जॅकेट इ.

**श्री सिल्क**
कांचीपुरम, कांजीवरम, वेडींग सिल्क सारीज

**PooAm's carry-a-way...**
रॉ सिल्क ते ज्यूटच्या मटेरियलच्या शॉपी बॅग्स आणि पर्सेस!

**स्टेप-इन-वॉक**
चप्पलस्, सँडल्स, शूज इ.

**ओमकार मार्केटींग**
हार्ड ॲनोडाइजड किचनवेअर्स

**राधा फॅशन्स**
ड्रेस मटेरियल आणि हॅन्ड वर्क कुर्ती मटेरियल

**रमा कलेक्शन**
रेडिमेड ड्रेस मटेरियल

**मोहक क्रिएशन**
स्त्रिया व मुलींसाठी कुर्तीज

**स्वप्नालंकार**
मोती पोवळी, पाचू, दागिने !

**कायरा कलेक्शन**
वैविध्यपूर्ण ड्रेस मटेरिअल आणि कुर्तीज

**राजू एम्ब्रॉयडरी**
कांथावर्क, मुर्शिदाबाद सिल्क साड्या, कलकत्ता एम्ब्रॉयडरीचे ड्रेस मटेरियल

**जिजाबाई बचत गट**
विविध प्रकारच्या बॅग्ज, कुशन कव्हर्स, पठाणी कुर्ता इ.

**जेजोधाज् इम्पेक्स**
हॅण्ड प्रिंटेड दोहरचे विविध प्रकार, बाटीक बेडशिट, पिलो कव्हर

**प्रथा कलेक्शन**
लखनऊ स्पेशल कुर्ती, टॉप्स, अनारकली इ.

**विकास लेदर**
लेदर पर्सेस, बॅग्ज, लेदर जॅकेट आणि लॅपटॉप बॅग

**शीतल बॅग्ज**
रेग्झिनने बनवलेल्या मजबूत बॅग्ज, सॅक, प्रवासी बॅग्ज

**हुगळी हँडीक्राफ्ट**
हाताने केलेले कशिदाकाम,ड्रेस मटेरीअल, कलकत्ता साड्या, ढाकाई, जामदानी सिल्क....

**मल्हार क्रिएशन**
२ ते १२ पर्यंतच्या मुलींचे फ्रॉक, बाळंतविडा इ.

**पिगी टेल्स्**
लहान मुला-मुलींसाठी कॉटनचे कपडे

**प्रिती गारमेंट**
गाउन्स, नाईट वेअर

**जयपूर हँडलूम**
जयपुरी चादरी, ड्रेस मटेरियल

**लुक ॲट मी**
सर्व वयोगटांसाठी नाईट सूट

**भारतीय खादी सेंटर**
पायजमे, पैरण रंगीत कुर्ते, शॉर्ट कुर्ते, शर्टस, शॉर्ट पँट, नाईट ड्रेसेस

**एम ॲण्ड एम एक्सक्लूझीव्ह**
शॅडोवर्कचे काम केलेले जीन्स-टॉप्स, शिफॉन, जॉर्जेट, कॉटन शॅडोवर्क साड्या, ड्रेस मटेरिअल

**ब्लीझ टी शर्टस्**
लहान मुलामुलींचे टी-शर्टस्

**स्वस्तिक होजियरी**
लहान मुलांचे कपडे, स्त्रियांची अंतर्वस्त्रे, स्लीप

ग्राहक पंचायत पेठ २०२२

**अथर्व कलेक्शन**
जामदानी, कोरा, इरी, बनारसी, कोसा सिल्क साड्या

**निलम क्रिएशन**
कॉटन कुर्तीज

**मंशा कलेक्शन**
बाटिक, बांधणी, प्रिंटेड कॉटन खादी कमान सिल्क, कलमकारी, दाबू कॉटन, चंदेरी कॉटन वगैरे

**राधिका वूलन**
स्वेटर्स

**एस ॲण्ड एस बॅग्ज**
डिझायनर पर्सेस

**पूजा क्रिएशन**
विविध प्रकारचे गाऊन्स, नाईट सूट, छोट्या मुलींचे गाऊन, इ.

**मायलेकी**
बटिक प्रिंटचे गाऊन्स

**वित्ताशी एंटरप्रायझेस**
हॅण्ड ब्लॉक, अजरख प्रिंट साड्या, ड्रेस मटेरिअल आणि स्टोल्स

**स्पर्श क्रिएशन**
लखनौ स्पेशल विविध प्रकारचे ड्रेस मटेरिअल व साड्या इ.

**सिल्व्हरलाईन टी शर्टस्**
मराठी कॅलिग्राफी केलेले टी शर्टस्

**वल्लरी गार्मेंट**
रेडीमेड फॅन्सी ब्लाऊज

**सिमरन कलेक्शन**
जयपूर प्रिंट असलेले कुर्ते, बाटीक क्रशचे कुर्ते, व कॉटन ड्रेस मटेरीयल !

**आरवली कलेक्शन**
प्रिंटेड नॅपकिन्स, जयपूर पॅचवर्क बेडशीटस् इ.

**निओ गारमेंट**
मराठी संदेश लिहिलेले टीशर्ट, ट्रॅक सूट आपल्या मस्त मस्त

**लक्ष्मी वल्लभ कलेक्शन**
उत्तम शिवणीचे टिकाऊ पेटीकोटस्

**आर.आर.क्रिएशन**
जयपुरी बेडशीट्स, बाटीक चादरी

**सह्याद्री फार्म्स**
राऊंड नेक कॉटन प्लेन टीशर्ट

**फॅबीरा फॅशन्स**
विविध प्रकारचे हाफ , स्लिव्हलेस गाऊन्स, कफ्तान इ.

**शिवम**
रेडिमेड पडदे सोफा बॅक कव्हर, चेअर कव्हर्स

**युनिक कलेक्शन**
सिल्क, धर्मावरम, पटोला बांधणी, गझी सिल्क, काथावर्क, कॉटन सिल्क, गढवाल सिल्क साड्या !

**माथेरान चप्पल**
सुंदर रंगसंगतीची चामडी पादत्राणे

**सजनी नाईटीज**
विविध प्रकारचे गाऊन्स, नाईटी, बाटीक, जयपुरी, हाफ गाऊन्स (वयस्कर स्त्रियांसाठी), नाईट सूट

**डी. टी. निटवेअर**
तरुणाईसाठी टी शर्टस्, बर्म्युडा पॅन्टस् इत्यादी

**सिल्कपाँड**
प्युअर सिल्क, महेश्वरी, इंदुरी सिल्क, बनारसी सिल्क ,मल कॉटन साड्या

**सॅफ्रॉन**
कलमकारी, ब्लॉक प्रिंट कुर्तीज्

**नर्मदालय**
विस्थापितांनी निर्मित दोहर, चादरी इत्यादी

**ट्विलाइट कँडल्स कं.**
सुगंधी आकर्षक मेणबत्त्या

**अहिल्या महिला मंडळ**
मलमलच्या गोधड्या, बाळंतविडे

**द बिग हँगर**
स्त्रिया व पुरुषांसाठी टीशर्ट, ट्रॅक पँटस्

**ट्रॅडिशनल ऑर्नामेंटस्**
पारंपरिक अलंकार व आभूषणे

**मुंबई ग्राहक पंचायत**
सभासद नोंदणी, शिक्षण, संस्थेची प्रकाशने, वितरण, शॉपी बॅग इ.

ग्राहक पंचायत पेठ २०२२

**अनघा सारीज**
लोपमुद्रा साडी (हातमाग), ड्रेस मटेरिअल्स, कापड तागे, तयार ब्लाऊज, तयार ड्रेसेस, ओढण्या

**रसिका अलंकार**
मायक्रो गोल्ड प्लेटेड ज्वेलरी

**ग्लास ग्लास आर्टिफॅक्टस्**
काचेचे दिवे, पूजा सेटस्, अत्तरदाणी इ.

**सदाफुली**
महेश्वरी, चंदेरी, हॅण्ड पेंटेड टसर, कॉटन ॲण्ड सिल्क खण साडी, लिनन इ.

**मारवा कलेक्शन**
महेश्वरी, चंदेरी, दाबू प्रिंट, कलमकारी, पटोला इत्यादी साड्या

**रिपल कलेक्शन**
मण्यांपासून बनवलेल्या की चेन्स, ड्रेससाठी डेकोरेटीव्ह पट्ट्या, पैंजण, तोरण, लटकन, टेबलमॅट, घट अशा भेटवस्तू !

**सारा कलेक्शन**
कॉटन, जयपूर, चिकन, खादी डेनीम, चंदेरी विविध प्रकारचे कुर्ते

**तिशी क्रिएशन**
खण कुर्ती मटेरिअल, खणाची ओढणी, कॉटन कुर्तीचे कापड, हॅण्डपेंटेड साडी

